चंद्रपूर येथे सैनिकी शाळेसाठी प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता व शैक्षणिक खर्च या बाबींकरिता निधी वितरणास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्र. चंसैशा - २०१९/प्र.क्र.२०/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७.०३.२०१९

वाचा :

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. इसैशा-२०१६/ प्र.क्र.९६/ एसएम-६ दिनांक १३.०४.२०१७
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. चंसैशा-२०१७/ प्र.क्र.५५/ एसएम-६ दिनांक २२.०८.२०१७
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. चंसैशा २०१८/ प्र.क्र. ३३/ एसएम-६ दिनांक १२.०९.२०१८
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पूरक-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९
५) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे पत्र क्र. जिपचं/शि(मा)/सैशा /४१०/२०१९,दिनांक १५.०२.२०१९
६) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८.०३.२०१९

प्रस्तावना :

चंद्रपूर येथे, सातारा सैनिकी शाळेच्या धर्तीवर नवीन सैनिकी शाळा सुरु करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाच्या दिनांक ९.४.२०१५ च्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर बल्लारपूर या मुख्य महामार्गावर भिवकुंड येथे सैनिकी शाळा प्रस्तावित करण्यात आली आहे. प्रस्तुत सैनिकी शाळेच्या विविध बांधकामांसाठी सुमारे ५०० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यासाठी अद्यापपर्यंत सुमारे ३१८.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. चंद्रपूर सैनिक शाळेबाबत केंद्र सरकार(केंद्रीय संरक्षण मंत्रालय) व राज्य शासन यांच्यामध्ये दि. १५ जुन २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर सामंजस्य करारातील तरतुदींनुसार प्रस्तुत सैनिक शाळेसाठी शैक्षणिक खर्च, प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता इत्यादी बाबींकरिता येणाऱ्या आर्थिक भाराची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

२. चंद्रपूर सैनिक शाळेसाठी सन २०१९-२० या वर्षाकरिता, प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता व शैक्षणिक खर्च याकरिता एकूण रु. ३.०० कोटी इतका निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., चंद्रपूर यांनी संदर्भ क्र.(५) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. चंद्रपूर सैनिकी शाळेसाठी प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता व शैक्षणिक खर्च तसेच वाहन खरेदी या बाबींकरिता सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात रु. ४२३.२४ लक्ष इतका निधी सुधारीत अंदाजामध्ये मान्य झाला असून त्यासाठी रु. १०००/- ची लाक्षणिक पुरवणी मागणी मान्य झाली आहे. त्यानुसार प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता व शैक्षणिक खर्च या बाबींकरिता रु. ३.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.(४) येथील दिनांक २५.१.२०१९ च्या व संदर्भ क्र. (६) येथील दि. ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार नवीन शैक्षणिक वर्षासाठी चंद्रपूर सैनिक शाळेसाठी प्रशासकीय खर्च, भोजनभत्ता व शैक्षणिक खर्च या बाबींकरिता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात फेब्रुवारी, २०१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात लाक्षणिक पुरवणी मागणीद्वारे व सुधारीत अंदाजामध्ये मान्य झालेला रु. ३.०० कोटी (रुपये तीन कोटी फक्त) इतका निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सातारा सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेशभत्ता व भोजनभत्ता यांचे लागू असलेले दर व याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश चंद्रपूर सैनिक शाळेसाठी लागू राहतील.

२. सदर खर्च सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात “मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी कामाबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करावा व याबाबत महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ करुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

३. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दिनांक ०२.०४.२०१८ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक १३.२.२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२७१२४८४२५५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4,
serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.03.27 17:51:09 +05'30'

(स्वाती म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्यमंत्री सचिवालय यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ३२

२. सर्व विधान सभा /विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मुख्य सचिव यांचे उप सचिव
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर,
१०.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.विभागीय शिक्षण उप संचालक,नागपूर विभाग, नागपूर
१३.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर
१४.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर,
१५.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर
१६.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर
१७.कक्ष अधिकारी , (व्यय ५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८.कक्ष अधिकारी(अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९.निवडनस्ती.

प्रत माहितीसाठी-

१. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई ३२
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.